सातारा जिल्हा परिषद,सातारा (सामान्य प्रशासन विभाग)

# अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळण्याबाबत प्राप्त झालेल्या अर्जापैकी जे अर्ज पात्र/अपात्र/प्रतिक्षाधिन ठेवावयाचे आहेत त्याबाबतचा अभिप्राय

## दिनांक २१.१२.२०१९

| अ.क. | अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळणेसाठी केलेल्या उमेदवारांचे नाव व पत्ता | उमेदवाराने प्रथम अर्ज केलेचा दिनांक | उमेदवाराची जन्मतारीख | मयत कर्मचा-यांचे नाव व हुद्दा | मयत कर्मचारी दिनांक | शेरा | मा.मु.का.अ.याचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री निलेशकुमार हिंदूराव जाधव, मु.पो.भोसरे ता खटाव | 17.7.2006 | 26.2.1987 | कै सुरेखा हिंदूराव जाधव, उपशिक्षक | 17.11.1991 | शासन निर्णय दि. ११ सप्टेंबर १९९६ नुसार सज्ञान झाल्यानंतर एक वर्षाच्या आत अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज केलेला नसल्याने या कार्यालयाकडील जा.क्र.आस्था-२(१) /अकपा/२००८ दि १९.३.०८ अन्वये सदरचा अर्ज निकाली काढलेला आहे. परंतु शासन निर्णय दिनांक २० मे २०१५ नुसार दिवंगत शासकीय कर्मचा-यांच्या अज्ञान उमेदवाराच्या बाबतीत तो उमेदवार सज्ञान झाल्यावर त्याला अनुकंपा नियुक्तीसाठी अर्ज सादर करण्यास १ वर्षापेक्षा अधिक २ वर्षापर्यंत (सज्ञान झाल्याच्या दिनांकापासुन ३ वर्षापर्यंत) इतका विलंब झाल्यास असा विलंब क्षमापित करण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना आहेत. श्री.निलेशकुमार जाधव यांनी सज्ञान झाल्यापासुन तीन वर्षाच्या आत अर्ज सादर केलेले असल्याने या कार्यालयाकडील पत्र क्रमांक जा.क्र.साप्रवि/ आस्था१(५)/ अकंपा/८११/१९.दिनांक ०८.११.२०१९ अन्वये अंतिम स्मरणपत्र देण्यात आलेले असून दिनांक १८.११.२०१९ पूर्वी कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत कळविले आहे. तसेच सदरचे पत्र जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. तथापी आजअखेर अपूर्ण कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही. पत्र पाहोच झाल्याबाबतची पोहोच पावती या कार्यालयाकडे प्राप्त झालेली आहे. | कागदपत्रांच्या पूर्ततेच्या अधिन राहून पद प्रतिक्षाधिन ठेवण्यात यावे. |
| 2 | श्री वैभव महादेव कदम, रा.नहरवाडी.पो.रहिमतपूर, ता.कोरेगाव | 21.1.2008 | 13.1.1990 | कै.महादेव विठोबा कदम उपशिक्षक | 24.5.1991 | श्री वैभव कदम याच्या मोठया भावाने अनुकपा तत्वावर नियुक्ती मिळण्याबाबत अर्ज न केल्याने या कार्यालयाकडील दिनांक १५.५.२००९ रोजीच्या पत्रान्वये व शासन निर्णय दिनांक २६ ऑक्टोबर १९९४ मधील तरतुदीनुसार त्यांचा अर्ज निकाली काढलेला होता. परंतु दिनांक ३१ जुलै २०१५ रोजीच्या शासन पत्रान्वये प्रथम सज्ञान होणा-याने किंवा कनिष्ठ सज्ञान होणा-याने अनुकंपा नियक्तीसाठी अर्ज केला तरी तो अर्ज अनुकंपा नियुक्तीसाठी ग्राहय धरता येईल. असे मार्गदर्शन प्राप्त झाल्याने श्री वैभव कदम यांचा अर्ज दिनांक २७.०८.२०१६ अन्वये मा.मु.का.अ.यांनी पात्र करण्यास मान्यता दिलेली आहे. तथापी श्री कदम यांनी अज्ञान असताना म्हणजेच दि.०१.०१.२०१८ रोजी अर्ज केलेला आहे. सदरचा अर्ज या कार्यालयाकडे दिनांक २१.०१.२००८ रोजी म्हणजेच श्री कदम हे सज्ञान झाल्यानंतर प्राप्त झालेला आहे. | श्री वैभव कदम यांनी अज्ञान असताना अर्ज केलेला आहे. तथापी हा अर्ज जिल्हा परिषदेस सज्ञान झाल्यावर प्राप्त झालेला आहे. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरचा अर्ज पात्र केलेला आहे. सदर बाबत शासनाकडून मार्गदर्शन मागवावे. व तोपर्यंत पद प्रतिक्षाधिन ठेवण्यात यावे. |